Estd: 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

## परिपत्रक

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली (विविध वित्तीय संस्था) तसेच महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्यामार्फत विविध शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती विद्यापीठ अधिविभागातील संशोधक विद्यार्थ्यांना मंजूर केल्या जातात. सदर अधिछात्रवृत्ती / शिष्यवृत्तीच्या रकमा या संबंधीत विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र बँक खात्यावर परस्पर जमा होत असतात. या विद्यार्थ्यांच्या संबंधीत शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्तीचे प्रगती अहवाल, घरभाडे व सातत्य प्रमाणपत्र, मा. कुलसचिव यांचे स्वाक्षरीने संबंधित शिखर संस्थेस पाठविले जातात. तथापि, अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची / फेलोशिप / आकस्मिक खर्च (Contingency Grants) रक्कम ही परस्पर विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र बँक खात्यावर जमा होत असल्याने व त्याच्या व्यवहाराची दस्तावेज (रेकॉर्ड) महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभागाकडे उपलब्ध होत नाहीत तसेच विद्यापीठाकडे सदर रकमेची कोणतीही नोंद दिसत नसल्याने (Classified मध्ये) लेखा विभागकडेही नोंद नसते. त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्रे, विनीयोग दाखला व आकस्मिक खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्रे लेखा विभाग अंतिम करु शकत नाही. त्यामुळे या विभागामार्फत मा. कुलसचिव यांची स्वाक्षरी घेता येत नाही. सदर बाब बार्टी, सारथी व विविध शिखर संस्था यांना पत्राद्धारे विद्यापीठाने कळविले आहे. तेंव्हा आदेशान्वये कळविण्यात येते की, अशा प्रमाणपत्रावर मा. विभागप्रमुख / मार्गदर्शक यांची स्वाक्षरी घेवून संबंधीत विद्यार्थ्यांनी संबंधीत शिखर संस्थेस परस्पर पाठविण्याची कार्यवाही करावी व त्याची एक प्रत महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग यांना माहितीस्तव देण्यात यावी.

**उपकुलसचिव,**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ : जा.क्र. एस. यु./ म.वि.वि.विभाग/ एस.व्ही.एम./ 9038

दिनांक : 05 SEP 2020

प्रति,

1) सर्व अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2) लेखा विभाग (पी.जी.)
3) स्वीय सहाय्यक, कुलसचिव कार्यालय
4) स्वीय सहाय्यक, वित्त व लेखाधिकारी कार्यालय